**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**
विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७
एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**मंगल कार्यालय**
लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
**सौभाग्य मंगल कार्यालय**
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, **मो.: ९०९६९६६२२२**

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २४१ वा | सोमवार, दि. ०५ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

**भाड्याने देणे**
सोलापूर ते अक्कलकोट रोड वरील हॉटेल व २४ रूम एसी लॉज भाड्याने देणे आहे

**विकणे**
मौजे तोगराळी, ता. द. सोलापूर येथील २० एकर बागायत जमीन विकणे आहे.
9890945626

**व्यवसाय / धंधा**
**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.
**मो: ९४२२६५११०१**

# 'जलजीवन'वर 15 हजार कोटी खर्च तरीही जनतेच्या घशाला कोरड

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारने 'जलजीवन मिशन' योजनेअंतर्गत 'हर घर जल' ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली, पण महाराष्ट्रात या योजनेवर 15 हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च करून राज्यातील जनतेच्या घशाला कोरड पडली आहे.

सध्या राज्यातल्या धरणातील पाणीसाठा फक्त 33 टक्क्यांवर आला आहे. तीन हजारांहून अधिक वाडयावस्त्यांची तहान टँकरच्या पाण्यावर भागवली जात आहे. हंडाभर पाण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेला वणवण करावी लागत असल्याने या योजनेला 'घरघर' लागल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने 2019मध्ये जलजीवन मिशन ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली. महाराष्ट्रात सप्टेंबर 2020पासून ही योजना राबवण्यात येत आहे. ग्रामीण भागातील कुटुंबांना प्रतिव्यक्ती 55 लिटर पाणी नळाने देण्याची योजना आहे. या योजनेतून राज्यात



सुमारे 52 हजार 282 पाणी योजनांना मंजुरी देण्यात आली, पण घराघरात पाणी तर दूरच सध्याच्या घडीला एक हंडा पाण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना एक-दोन किमीची पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी तर काही जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

राज्यात या योजनेवर आतापर्यंत सुमारे 15 हजार 434 कोटी रुपये खर्च झाल्याची आकडेवारी आहे; पण तरीही राज्यातील जनता तहानलेली आहे. उलट जलजीवन मिशनच्या 17 हजार योजनांना सुधारित मान्यता देण्याची वेळ आली आहे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर आणखी सहा ते सात हजार कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे.

### तीन हजार वाडया-गावे टँकरच्या पाण्यावर

सध्याच्या परिस्थितीत जलजीवन योजनेचे महत्त्व प्रकर्षाने जाणवू लागले आहे कारण राज्यातल्या धरणातील पाणीसाठा 33.71 टक्क्यांवर आला आहे. पाणी पातळी झपाटयाने खालावत चालल्याने टँकरची संख्या वाढू लागली आहे. सध्याच्या घडीला राज्यातल्या 2 हजार 257 वाडया आणि 758 गावांची तहान भागवण्यासाठी सुमारे 936 टँकर ग्रामीण भागात धावत आहेत.

### योजनेत भ्रष्टाचाराची तक्रार

अर्थसंकल्पीय अधिवेशात जलजीवन मिशन योजनेतील भ्रष्टाचारावरून विरोधकांनी सरकारला कारंडीत पकडले होते. पात्र नसलेल्या कंत्राटदारांना कंत्राटे, पाईप खरेदी, सल्लागार, निधी वितरण, अनावश्यक कामे अशा विविध तक्रारी आहेत. या योजनेचा खर्च जाणीवपूर्वक वाढवण्यात आल्याचा आरोप आहे.

# उद्योजक होण्यासाठी यशाची पंचसूत्री महत्त्वाची- आ. रणजितसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** प्रचंड इच्छाशक्ती, सकारात्मकता, वेळेचे महत्व, व्यवहार ज्ञान, व अचूक प्रश्नाची जाण या पंचसूत्रीवर यशस्वी उद्योजक होता येते असे मत आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

स्मृतीभवन शंकरनगर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त कौशल्य विकास केंद्र पीएम उषा योजनेअंतर्गत आयोजित केलेल्या एक दिवसीय नवउद्योजक कार्यशाळेला मार्गदर्शन करताना



ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी, विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, रोटरी क्लब सराटी डिलाईट, राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय यांच्या वतीने सदरच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, शितलदेवी मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, एम एस एम इ चे मुंबई कार्यालय प्रमुख मिलिंद बारापत्रे, सहाय्यक सुनील खुजणारे, विद्यापीठाचे प्र कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, प्रभाकर कोळेकर, एन एस आय सी चे उपसंचालक रितेश रंगारी, ऑर्गनिक फार्मचे ओनर सत्यजित हांगे, सोलापूर उद्योजकता केंद्राच्या संगीता खंदारे यांच्यासह नवउद्योजक पुरुष, महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रस्ताविकात खा. धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले, सोलापूर व माढा मतदारसंघातील युवाकांना राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची माहिती व्हावी, यातून उद्योजक घडावेत यासाठीच या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सन 2022 साली पहिले मार्गदर्शन शिबिर झाले. सुमारे चौदाशे प्रशिक्षणाथीर्तून गुणवत्तेनुसार 100 तरुणांची गुजरात येथील उद्योजकता कार्यक्रमासाठी निवड झाली. आज ते उद्योजक म्हणून कार्यरत आहेत.

माळशिरस व मेंढापूर येथे मिनी एमआयडीसीत रूपांतर करून यामध्ये द्राक्ष, केळी आदी फळापासून उपपदार्थ निर्मिती करता येईल यासाठी ही प्रयत्न करत आहोत. तुम्ही उद्योजक बना लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असा विश्वास ही त्यांनी यावेळी दिला.

आ. उत्तमराव जानकर म्हणाले, आपणास उद्योजक व्हायचे आहे हे मनात ठरलं पाहिजे. अपयश हे शिकवण्यासाठी येतं. कोणत्याही व्यवसायाची लाज वाटता कामा नये. ध्येय ठरवा व त्यानुसार वाटचाल करा. सहकार महर्षींनी अडचणीवर मात करीत परिसराचे नंदनवन केले.

एम एस एम इ चे मुंबई कार्यालय प्रमुख **(पान 2 वर..)**

# देशाला जे वाटतं आहे ते होणारच - राजनाथ सिंह यांचा पाकिस्तानला इशारा



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सनातन संस्कृती जागरण महोत्सवात सहभाग घेतला होता. दिल्लीच्या या कार्यक्रमात राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला इशारा दिला आहे. मी देशाचा संरक्षण मंत्री आहे, त्यामुळे माझं हे कर्तव्य आहे की मी आपल्या सैनिकांसह आपल्या देशाच्या सीमांचं रक्षण करेन.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात देशाला जे वाटतं आहे ते होणारच असं म्हणत राजनाथ सिंह यांनी या कार्यक्रमात पाकिस्तानला इशारा दिला आहे.

### राजनाथ सिंह यांनी काय म्हटलं आहे?

'आपल्या देशाकडे कुणी डोळे वटारुन पाहिले तर त्यांना मुंहतोड उत्तर देणं हे आमचं काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना सगळं माहीत आहे. तसंच तुम्हाला त्यांची कार्यशैली माहीत आहे. पंतप्रधान मोदी जोखीम पत्करु शकतात हे सगळ्यांनाच माहीत आहे. आपल्या देशाकडे डोळे वटारुन पाहणाऱ्या देशाला ते नक्की उत्तर देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदींची शैली तुम्हाला सगळ्यांनाच माहीत आहे. मी या मंचावरुन तुम्हाला आश्वासन देतो की तुम्हाला जे वाटतं आहे तसंच उत्तर दिलं जाईल.' असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

### आणखी काय म्हणाले राजनाथ सिंह?

२०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र होईल असं लक्ष्य पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठेवलं आहे. हे लक्ष्य छोटं नाही हे तर आपण सगळेही समजू शकतो. पण तुम्ही सगळ्यांनी निश्चिंत राहा. हे लक्ष्य पूर्ण होणार म्हणजे होणारच. कारण हे सत्य आपण सगळ्यांनी स्वीकारलंच आहे की आपल्या देशाचा डंका आंतरराष्ट्रीय स्तरावर पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे वाजतो आहे. आपल्या देशाची किर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढली आहे. पूर्वी अशी स्थिती होती की भारताने काहीही म्हटलं तरीही ती बाब गांभीर्याने घेतली जात नसे. भारत कमकुवत देश आहे असं म्हटलं जात होतं. आज मात्र ती परिस्थिती नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत जे म्हणणं मांडतो ते गांभीर्याने घेतलं जातं. सगळ्या जगाचं त्याकडे लक्ष असतं असंही राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

### पहलगाम बाबतची अपडेट काय?

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अनंतनागमध्ये २५ हून अधिक टुरिस्ट गाईड्सची चौकशी करण्यात आली आहे. तपास यंत्रणांना हे माहीत आहे की स्थानिकांच्या मदतीशिवाय हल्ला होणं हे जवळपास अशक्य आहे. त्यामुळे आता तपास यंत्रणा अधिक खोलात जाऊन तपास करत आहेत. दहशतवाद्यांना शोधण्यासाठीची मोहीम आणखी तीव्र करण्यात आली आहे.

# दिलीप माने की सुरेश हसापुरे ? कोण होणार बाजार समितीचा सभापती

**सोलापूर, (कटुसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती निवडीसाठी रविवार, ११ मे रोजी सकाळी ११ वाजता बाजार समितीच्या लोकनेते बाबूराव चाकोते प्रशासकीय इमारतीत जिल्हा उपनिबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा बोलाविण्यात आली आहे. सभेची ही अधिसूचना बाजार समितीचे सचिव दत्तात्रय सूर्यवंशी यांनी काढली आहे.

दरम्यान, सभापतिपदी माजी आमदार दिलीप माने की जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे या दोघांपैकी कोणाची वर्णी लागणार हे अद्यापही गुलदस्त्यातच आहे. सभापतिपदाचा फैसला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच घेणार असल्याचे यापूर्वीच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी रविवार, २७ एप्रिल रोजी मतदान झाले होते. याचा निकाल सोमवारी दुसऱ्या दिवशी जाहीर झाला. यात अक्कलकोटचे



आमदार कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वातील दिलीप माने, राजशेखर शिवदारे, सुरेश हसापुरे यांच्या गटाला बहुमत मिळाले आहे. विरोधी आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखालील गटाला केवळ तीन जागांवर समाधान मानावे लागले.

आता बाजार समितीचे सभापती व उपसभापती कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आमदार कल्याणशेट्टी यांच्याप्रमाणेच संचालक मंडळाच्या निवडीनंतर जल्लोष करताना माजी आमदार माने यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक झाली. त्यामुळे सभापती कोण होणार हे मुख्यमंत्री फडणवीसच ठरवणार असल्याचे जाहीर केले होते. सभापतींचे नाव निश्चित करण्यासाठी अद्याप मुख्यमंत्र्यांची भेट झाली नसल्याचे सांगण्यात येत आहे. येत्या दोन दिवसात यावर शिक्कामोर्तब **(पान 2 वर..)**



संपादकीय

# महागाईवर फुंकर

भाववाढीने त्रस्त झालेल्या सर्वसामान्यांसाठी काही दिवसांपूर्वीच एक शुभवार्ता आली आहे, घाऊक महागाई दरात सलग दुसऱ्या महिन्यात घसरण झाली आहे. भारतात मार्च महिन्यात घाऊक किंमत निर्देशांक 2.05% पर्यंत घसरला, जो फेब्रुवारीमध्ये 2.38% होता. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारीमध्ये अन्न महागाई 3.38% होती, जी मार्चमध्ये 1.57% पर्यंत कमी झाली. भाज्यांच्या किमतीत 15 टक्क्यांनी घट झाली. कारण, पालेभाज्या असोत वा अन्य भाज्या, त्यांच्या उत्पादनात भरघोस वाढ झाली आहे.

बाजारातील आवकही चांगली आहे. फेब्रुवारी 2025 मध्ये किरकोळ महागाई दर 3.61 टक्क्यांपर्यंत खाली आला होता, जो गेल्या सात महिन्यांतील नीचांक होता. जागतिक अनिश्चितता आणि भारत-पाकिस्तान यांच्यातील वाढता तणाव या पार्श्वभूमीवर चलनफुगवटा कमी होणे, ही दिलासादायक बाबच मानावी लागेल. अन्य उत्पादित वस्तूंपेक्षा रोजच्या रोज ज्या जीवनावश्यक वस्तू लागतात, त्यामध्ये धान्ये, फळे, भाज्या वगैरेंचा समावेश होतो आणि त्याच्या किमती कमी होण्यामुळे गोरगरिबांचे जीवन सुसह्य होऊ शकते, हे लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.

एप्रिल 2023 ते मे 2024 पर्यंत 'एल निनो'चा परिणाम जाणवत होता. त्यामुळे दोन अंश जास्त तापमानवृद्धी झाली होती. परिणामी भारतातील अनेक भागांत 2023-24 मध्ये कमी पाऊस पडला. शिवाय अवकाळी पाऊस पडल्यामुळे नुकसान झाले. शिवाय हिवाळा दिरंगाईने सुरू झाला आणि 15 मार्चपासून ते 15 जून 2024 पर्यंत उन्हाळ्याची तीव्र लाट पसरली होती. म्हणजेच पावसाळा लांबला, हिवाळा उशिरा सुरू झाला आणि उन्हाळा लवकर आला. यामुळे पीकपाण्यास फटका बसला.

2023-24 च्या आकडेवारीनुसार, कृषी आणि संलग्न क्षेत्राचा विकासदर फक्त 1.4% होता. त्याच्या अगोदरच्या वर्षात तो 4.7% होता. 2024-25 मध्ये कृषी विकासदर 3.8% इतका होता, तो बिलकुल समाधानकारक मानता येणार नाही. त्यामुळे जुलै 2023 आणि डिसेंबर 2024 या काळात ग्राहक किंमत निर्देशांक सरासरी साडेआठ टक्के इतका प्रचंड होता. गेल्या अनेक वर्षांत चलनवृद्धीचे प्रमाण इतके जास्त आणि शिवाय महागाई अधिक काळ टिकून असण्याची ही पहिलीच वेळ होती.

2023 आणि 2024 या वर्षातील महागाईमुळे लोकांना आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा अन्नवस्तूंवरच खर्च करावा लागत होता. त्यामुळे हिंदुस्तान लिव्हरसारख्या भारतातील 'फास्ट मूव्हिंग कन्ज्युमर गुड्स' क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीच्या वार्षिक उलाढालीत त्या काळात दोन-तीन टक्के इतकीच वाढ झाली होती. परंतु आता देशातील कृषी उत्पादनामध्ये वाढ झाली असून, 'एल निनो' आता नाही. त्याचप्रमाणे पाऊस बऱ्यापैकी झाला आहे. त्यामुळे भारताच्या गोदामांतील गव्हाच्या साठ्यात 57% ची वाढ झाली आहे. 1 कोटी 18 लाख टन इतका गहू आपल्या गोदामांत आहे.

गेल्यावर्षी भारतीय अन्न महामंडळाने 2 कोटी 66 लाख टन गहू खरेदी केला होता, यावर्षी तो 3 कोटी 10 लाख टन इतका खरेदी करण्याचे उद्दिष्ट आहे. तर 1 जानेवारी 2025 रोजी सरकारी गोदामांत 6 कोटी 9 लाख टन इतका तांदळाचा साठा आहे. भारतात तांदळाची वार्षिक मागणी 10 कोटी टन इतकी असते. तर उत्पादन 12 कोटी टन इतके होते. त्यामुळे अतिरिक्त साठा निर्यात करता येऊ शकेल. याउलट केवळ गव्हाचा विचार केला, तरीदेखील 2023-24 चे पीक फार कमी आले होते. मध्य भारतात हिवाळा उशिरा आला होता. प्रतिकूल हवामानामुळे मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातील गव्हाचे उत्पादन तेव्हा खूप कमी आले होते. त्यामुळे 2024 मध्ये गव्हाचे भाव फार जास्त होते. यंदा मध्य भारतात गव्हाचे उत्पादन चांगले आहे. पंजाब आणि हरियाणात अनुकूल हवामान असल्यामुळे उच्च जातीच्या गव्हाच्या उत्पादनात मोठीच भर पडली आहे.

केंद्र सरकार दर महिन्याला अन्नधान्य किरकोळ महागाई निर्देशांक, म्हणजेच कंज्युमर फूड प्राइस इंडेक्स जाहीर करत असते. सप्टेंबर 2020 मध्ये हा निर्देशांक 161 अंश होता. तर 2021 मध्ये तो 162 अंश होता. अन्नधान्याची घाऊक महागाई पाच वर्षांपूर्वी सुमारे 8 टक्के होती, तर सप्टेंबर 2021 मध्ये ती उणे 4.890% इतकी कमी होती. याचे कारण, तेव्हा करोना होता. वस्तूंची मागणी आणि एकूणच व्यापार कमी झाला होता.

आज तो निर्देशांक 167 अंशांच्या आसपास आहे. मुळात सौदी अरेबियाने कच्च्या तेलाचे भाव कमी केल्यामुळे जगातील ब्रेंट क्रूडचे दर सरासरी चार टक्क्यांनी घटले आहेत. आज एका बॅरलला 63 डॉलर असा दर आहे. मागच्या आठवड्यात तो दर 11% नी घटला होता. 'ओपेक प्लस अलायन्स'ने अचानकपणे कच्च्या तेलाचे उत्पादन वाढवण्याचे ठरवले आहे. शिवाय तेलाचे भाव खाली आणण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ओपेक देशांवर दडपण आणले आहे. रशिया हा तेलाचा मोठा उत्पादक आहे. तेलाचे जागतिक भाव घसरल्यास, युद्धसमाप्तीसाठी रशियावर दडपण येईल, असे अमेरिकेला वाटते.

सौदी अरेबियातून अमेरिका व युरोपीय देशांना मोठ्या प्रमाणावर तेल जाते आणि त्यासाठीच सौदीने दर कमी करून अमेरिकेची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न चालवला आहे. जगातील युद्धाच्या सावल्या आणि ट्रम्प यांची जागतिक व्यापारविरोधी करधोरणे, यामुळे एकूणच बाजारपेठेत नरमाई आली आहे. भारतात कृषी उत्पादन समाधानकारक असून, धान्यसाठेही पुरेसे आहेत. यावेळी मान्सूनही उत्तम असेल, असा अंदाज वेधशाळांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे 2025 हे वर्ष ग्राहकांच्या दृष्टीने समाधानकारक असेल, असा अंदाज आहे.

# एकीकडे उष्णतेची लाट; तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!!

बदलते हवामान व उष्णतेची लाट यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होतांना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाढत्या उष्णतामानामुळे राज्यातील जल साठा आतापासूनच ३८ टक्क्यांवर येवून ठेपला आहे आणि पुढील दोन महिने अजून बाकी आहे त्यामुळे जलसाठ्याची घसरगुंडी अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. कारण पुणे, विदर्भ, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मराठवाडा येथील संपूर्ण मोठ्या धरणांचा जलसाठा झपाट्याने खाली घसरत आहे. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील अनेक भागातील नागरिक सापडल्याचे दिसून येते. त्यामुळे आतापासूनच पाण्याचे गांभीर्य लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून योग्य वापर करण्याची गरज आहे. कारण राज्यातील जलसाठ्याची आकडेवारी पहाली तर अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे ती याप्रमाणे नागपूर ३९ .२७ टक्के, अमरावती ४८.९६ टक्के, पुणे ३२.७० टक्के, छत्रपती संभाजीनगर ३८.७७ टक्के, नाशिक ४२.६४ टक्के कोकण ४८.४१ अशाप्रकारे प्रमुख शहरातील जलसाठ्याची स्थिती आहे आणि दररोज झपाट्याने साठा कमी-कमी होत आहे यावर सरकारने ताबडतोब गांभीयार्ने लक्ष केंद्रित करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील दोन महिन्यांत यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. आज राज्यातच नाही भारतासह संपूर्ण जगात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे परिस्थितीनुसार पाण्याचा वापर होणे अत्यंत गरजेचे आहे. आज पाणी टंचाईची समस्या जगातील इतर अनेक ठिकाणांसारखीच थायलंडमध्येही आहे. मात्र त्यामुळे सण साजरा करण्याच्या उत्साहात अडचण येऊ नये म्हणून फॉगी स्प्रे, ईको-फ्रेंडली वॉटर गन्ससारख्या गोष्टींचा वापर केला जातो. म्हणजे सणाच्या निमित्ताने सुध्दा पाण्याची बचत केली जाते ही बाब थायलंड कृतीतून सिद्ध होते. त्यामुळे भारतात उन्हाळ्यातील पाण्याची गंभीर समस्या पहाता पाण्याचा एक-एक थेंब वाचविणे अत्यंत गरजेचे आहे. आज महाराष्ट्रासह भारतातील अनेक ग्रामीण भागात पाण्याची गंभीर समस्या आहे. कारण आजही ग्रामस्थांनांना पाण्यासाठी ३ ते ४ किलो मिटर अंतरापर्यंत वनवन हिंडावे लागते ही संपूर्ण परिस्थिती बदलते हवामान, जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वनवे लागने, ग्लोबल वॉर्मिंग, समुद्राची पातळी वाढने या संपूर्ण गोष्टींमुळे भुजल साठा दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो. आजही आपण पहातो की वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे म्हणजे पाणी समस्ये गंभीर रूप धारण केले असून पुढे चालून आक्राळविक्राळ रूप धारण करू शकते यालाही नाकारता येत नाही. कारण आजही राज्यासह देशातील अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेड झोनमध्ये असल्याचे सांगितले जाते. कारण संपूर्ण सृष्टी, मनुष्य, संपूर्ण जीवजंतू पाण्याशिवाय जगूच शकत नाही त्यामुळे सरकारने पावसाळ्यात पाणी अडविण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे, पाणी जमीनीच्या पोटात गेले पाहिजे यासाठी युध्दपातळीवर वृक्षलागवड काळाची गरज आहे, औद्योगिकीकरणावर सरकारने लगाम कसली पाहिजे, वाढते शहरीकरण यावरही अंकुश लागायला हवा. कारण निसर्ग सुखरूप रहाला तर सर्वच काही ठीक राहील अन्यथा विनाशकारी प्रक्रिया दिवसेंदिवस वाढतच जाईल म्हणून पाण्याच्या बाबतीत सरकारने सावधगिरीने पाऊल उचलने गरजेचे आहे. वृक्षतोडीची झळ सर्वांनाच भोगावी लागते ही बाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कृतीतून सांगितली. नागपूर शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील अनेक भागांत नागपूर महानगरपालिकेव्दारे वृक्षतोड केली जात आहे. पण बदल्यात वृक्षारोपण मात्र शहराच्या बाहेर केले जात असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोंदविण्यात आले. शहरातील झाडे तोडली जात असल्यास शहराबाहेर वृक्षारोपण काय कामाचे, अशा शब्दात नागपूर खंडपीठाने महापालिकेला खडसावत क्रीडा संकुलासह इतर ठिकाणी प्रस्तावित वृक्षतोडीवर अंतरिम स्थगितीही दिली आहे. १ हजार ३७४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव असून या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. या वृक्षतोडीच्या बदल्यात गोरेवाड्यात वृक्षारोपण करणार असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली. वृक्षतोड शहरात करायची आणि वृक्षारोपण शहराबाहेर करायचे, हे चालणार नाही असे न्यायालयाने मौखिकपणे नमूद केले. यावरून आपण समजू शकतो की वृक्षतोडीमुळे पाण्यासह जीवनाशी निगडित अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. शहरातील वृक्ष तोडायचे आणि शहराबाहेर वृक्षारोपण करायचे याला काय अर्थ? अशा शब्दातही उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिकेला खडसावले. यावरून लक्षात येते की शहरीकरणाच्या नावाखाली नागपूरसह राज्यातील अनेक भागांत वृक्षांची कत्तल सुरु आहे ही बाब सिद्ध होते आणि आज राज्यात किंवा देशात जी पाण्याची समस्या भेडसावत आहे व पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त वृक्षतोड व जंगलतोड होय. वृक्ष कटाई पाच मिनिटांत होते. परंतु एक वृक्ष लावून मोठे करायला पाच वर्षे लागतात याचे गांभीर्य सरकारने लक्षात ठेवून जलसंपदा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने सर्वच स्तरातून वृक्षलागवडीवर भर देण्याची गरज आहे. सरकारमार्फत जेवढी झाडे तोडायची असेल त्याच्या दुप्पट वृक्षलागवड सरकारने प्रथम करावी; नंतर वृक्ष तोडण्याचा निर्णय द्यावा. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

प्रबोधन

# महाराष्ट्र माझा । सर्वांगी फुलू दे

महाराष्ट्र म्हणिजे महंतराष्ट्र' अशी थोर पुरुषांनी महाराष्ट्राची ओळख करून दिली असली, तरी 'महंती'पुरताच महाराष्ट्र, हे मात्र खरं नाही. राकट देशा, कणखर देशा` दगडांच्या देशा असं म्हणून महाराष्ट्र हा अंजन, कांचन, करवंदीचा काटेरी देशही आहे, हे गोविंदाग्रजांचे उत्स्फूर्त उद्गार खोटे नसले तरी महाराष्ट्राचा भूगोल दगड आणि काटे यांचाच उल्लेख होण्यासारखा रूक्ष नाही, हे त्यांनीच पुढे बकुल फुलांच्या, प्राजक्तीच्या दळदारी देशा असा मृदू-गंधित उल्लेखही केला आहे. कविवर्य वसंत बापट यांना तर डोंगर-दऱ्यांनी व्यापलेला महाराष्ट्रच भुरळ घालतो. म्हणून तर ते भव्य हिमालय तुमचा - अमुचा । केवळ माझा सह्यकडा। गौरीशंकर उभ्या जगाचा । मनात पूजीन रायगडा` अशी कालजयी इतिहास घडवणाऱ्या शिवरायांची भावपूर्वक आठवण करतात. ते तुकोबांनाही विसरत नाहीत, कारण तो त्यांचा आधार आहे. खिस्त-बुद्ध विश्वाचे शास्ते । तुकयाचा आधार मला - अशी महाराष्ट्राची भावसमृद्धीही ते दाखवतात.

भारताच्या अन्य राज्यांकडे पाहिल्यावर महाराष्ट्र खूप सुदैवी वाटतो. कारण इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून अनेक कुशल हात महाराष्ट्राला घडवीत आले आहेत. त्यांनी महाराष्ट्राला अक्षरशिल्पाचा दर्जा स्वतःच्या मेहनतीने प्राप्त करून दिला आहे. महाराष्ट्र ही केवळ संतांची मांदियाळी नाही; तर ती समाजसुधारक, क्रांतिकारक, समशेरधुरंधर, मुत्सद्दी, विचारवंत, राष्ट्रोद्धारक, प्रजावत्सल महाराजे, साहित्य-कला-क्रीडा क्षेत्रातील दिग्गज यांचीही जन्मभूमी आहे, हे अभिमानपूर्वक नमूद करावं लागेल. महाराष्ट्राला लाभला तसा सामाजिक सुधारणांचा उज्ज्वल इतिहास अन्य कोणत्याही राज्यात दाखवता येणार नाही.

मराठी भाषा हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. माझा मऱ्हाठा चि बोलु कवतिके। परी अमृताते पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥ अशी प्रतिज्ञा करून ती संत ज्ञानदेवांनी खरीही करून दाखवली. इये मऱ्हाटीचिये नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळू करी। असा त्यांचा अध्यात्मवादी निश्चय असला तरी, त्यांनी वाढवलेल्या, बहरास आणलेल्या भाषावृक्षाखाली संतांनी जसा आपला संसार थाटला, तसाच इतरेजनांनीही थाटला. त्यात पंडित कवी होते, शाहीर कवी होते आणि बखरकारही होते. मराठीत राज्यव्यवहार कोशाची निर्मिती करून छत्रपती शिवरायांनीही मराठीच्या समृद्धीत आपलं मोलाचं योगदान दिलं. महाराष्ट्रात राहून मराठीऐवजी संस्कृतवर प्रेम करणाऱ्यांना संत एकनाथांनी संस्कृत भाषा देवे केली। मग प्राकृत (मराठी) काय चोरापासून झाली? । असा प्रश्न करून निरुत्तर तर केलंच, पण असंस्कृतही ठरवलं. मराठीचे सुपुत्र तुकोबा आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच यत्ने शस्त्र करू। असं शब्दधनाचं भांडार आपल्या अर्थसघन अभंगातून खुले करीत गेले. त्यामुळे ते अध्यात्माचे वाहक न वाटता मायमराठीचे निष्ठावंत साधक वाटल्यास नवल नाही.

आधुनिक काळाच्या प्रारंभी इंग्रजीरूपी वाघिणीचं दूध पिऊन एकोणिसाव्या शतकात समाजसुधारकांनी समाजपरिवर्तनाची जी धुमधमाल उडवली ती अवाक करणारी होती. शिक्षण, जाति-निर्मूलन, स्त्रीवर्गाची सुधारणा, रूढी-परंपरामुक्त समाजनिर्मिती, अस्पृश्योद्धार, स्वदेशनिष्ठाजागृती अशा अनेक क्षेत्रांत महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेलं कार्य केवळ अविस्मरणीय आहे. आधुनिक महाराष्ट्र त्यांच्याच नावाने ओळखला जातो, इतकं त्यांचं कार्य मूलगामी आहे.

पण महाराष्ट्राची खरी ओळख वेगळीच आहे. शहरी महाराष्ट्र आणि ग्रामीण महाराष्ट्र असा फरक केल्यावर महाराष्ट्राचा जो ग्रामीण चेहरा समोर येतो, तो मात्र दगडांच्या देशा, काटेरी देशा या शब्दांत वर्णन करावा, असा भयभीत करणारा आहे. प्रत्येक गाव, गट, तट, जातपात, भाऊबंदकी, हेवेदावे यांनी ग्रासलेला आहे. एकजूट, प्रेम, सलोखा, जिव्हाळा, सहकार्य, सद्भाव यांच्यात वाढ होण्याऐवजी घट होताना दिसत असेल, तर हा महाराष्ट्राचा विकास आहे काय? वास्तविक गेल्या पन्नास वर्षांत तरी आपण प्रत्येक गावाला मूलभूत सुविधा पुरवू शकलो काय, हा अंतर्मुख होऊन विचार करावा, असा प्रश्न आहे. एकीकडे शहरी दहा टक्के लोकांसाठी नव्वद टक्के सुखसोयी पुरवणं आणि दुसरीकडे नव्वद टक्के ग्रामवासी जनतेला दहा टक्के सुविधाही न पुरवणं, हे 'कल्याणकारी राज्य' म्हणवणाऱ्या राज्याला शोभून दिसतं काय? ग्रामीण लोक अजूनही ज्ञानदेव-नामदेव यांच्या काळातच मनाने गुंतून पडलेत. त्यांना एकविसाव्या शतकात कोणी आणि कसं आणायचं? विज्ञान-तंत्रज्ञानाच्या वार्ता तरी त्यांच्यापर्यंत नको का पोहोचायला? हे कधी होईल? हे प्रश्नच सांगतात-

महाराष्ट्र आहे। दोन चेहऱ्यांचा
त्यांच्यामध्ये आहे। अंतरही ॥ १
शहराचा छान । चेहरा राजस
खेड्यांचा भकास। दिसे का हो? ॥२
नागरिक सुखी। ग्रामवासी दुःखी
का नाही सारखी। प्रजा सारी ? ॥ ३
मुंबई-पुण्यात। नेते राहातात
पायांपाशी येत । सोयी साऱ्या ॥४
खेडुतांना होते। जगण्याचे वांधे
नेत्यांचे हे धंदे । कुचकामी ॥५
सर्व ऋतू देती। खेडुतांना त्रास
नागरी मिजास । वाढविती ॥६
महाराष्ट्र माझा। शहरात फुले
ग्रामीण सुकले। यातनांनी ॥७
महाराष्ट्र माझा। सर्वांगी फुलू दे
समृद्धी येऊ दे । सकळिका ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# शासनाने गुंडाळली स्मार्ट सिटी योजना

**सोलापूर : (कटुसत्य वृत्त):-** राज्यातील प्रमुख शहरांसाठी महत्त्वाकांक्षी म्हणून घोषित केलेल्या स्मार्ट सिटी योजनेत असलेल्या अध्यार्हून अधिक शहरातील कामे रखडली असताना केंद्रशासनाने ही योजना गुंडाळली आहे. निवड झालेल्या सर्व कामे महानगरपालिकेकडे वर्ग केल्याचे पत्र पाठवत योजना बंद केल्याचे जाहीर केले. महानगर पालिकेस असे पत्र प्राप्त झाल्याचे महापालिका आयुक्तांनी जाहिर केले आहे.

केद्रशासनाच्या स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून ७८४ कोटींचा निधी सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेट कंपनीला मिळाला. यामाध्यमातून शहरात ७३१ कोटी रुपये खर्च करून ४६ विकासकामे करण्यात आली. सर्व कामे पूर्ण झाल्याने

महापालिकेकडे हस्तांतरीत केली आहेत. निधीही संपला, नवीन कामही नाही. केंद्राच्या चालू आर्थिक वर्षाच्या बजेटमध्ये स्मार्ट सिटीच्या निधी तरतुद केली नाही त्यामुळे हा प्रकल्प गुंडाळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आली होती.



देशातील दहा स्मार्ट शहरामध्ये सोलापूराचा समावेश होता. केंद्रशासन ७० टक्के राज्य शासन ३० टक्के आणि महापालिकेचा हिस्सा १० टक्के हिस्सा या माध्यमातून शहरात विकासकामे केली आहेत. यामध्ये ४६ विकास कामाचा डिपीआर तयार करण्यात आला. यातील समांतर जलवाहिनी वगळता सर्व कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे स्मार्ट सिटीने सर्व कामे महापालिकेकडे हस्तांतरीत केली आहेत.

### मिळालेला निधी

या योजनासाठी केंद्र शासनाकडून ३९२ कोटी, राज्यशासन १९६ कोटी, महापालिकेचा हिस्सा १९६ कोटी, असा एकूण ७८४ कोटींचा निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी ७३१ कोटींचा निधी खर्च झाला आहे. ५२.७१ कोटींचा निधी शिल्लक आहे.

### दोनच कर्मचाऱ्यांवर होती कार्यालयाची मदार

जिल्हानियोजन समितीच्या शेजारी स्मार्ट सिटीचे कार्यालय होते. त्यानंतर महापालिकेच्या कंमाड अॅन्ड कंट्रोल इमारतीमध्ये दोन रूममध्ये कार्यालय स्थलांतर करण्यात आले. सीईओ म्हणून गोपिचंद कदम यांची नियुक्ती करण्यात आली होती. दोन महिन्यात कदम यांची बदली करण्यात आली सध्या हे पद रिक्त आहे. दोन कर्मचाऱ्यांवर कार्यालयाची मदार होती.

# 'मॅजिकल महाराष्ट्र' दालन ठरले प्रेक्षकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू

## डिजिटल दालनाची प्रेक्षकांवर मोहिनी

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** एखाद्या परिषदेमध्ये किंवा महोत्सवामध्ये उभारलेल्या दालनात पुस्तिकेच्या रूपाने माहिती देण्याची प्रचलित पद्धत आहे. वेव्हज २०२५ मध्ये उभारलेल्या महाराष्ट्राच्या दालनाने ही परंपरा मोडीत काढली असून 'मॅजिकल महाराष्ट्र' या नावाने संपूर्णतः डिजिटल स्वरूपात उभारलेल्या या दालनाने येथे भेट देणाऱ्या प्रेक्षकांवर अक्षरशः जादू केली आहे. या दालनाचे त्रिमिती मधील डिजिटल प्रवेशद्वार आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराची शानदार झलक दाखवित आहे.

हे दालन खास करून मराठी चित्रपटांना समर्पित करण्यात आले आहे. गाजलेल्या मराठी चित्रपटांची माहिती येथे आधुनिक स्वरूपात प्रदर्शित करण्यात आली असून महाराष्ट्राच्या समृद्ध मनोरंजन वारशाची ही जादुई झलक मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये ऐकण्यासाठी सुद्धा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये चित्रपटसृष्टीच्या प्रारंभापासून आजच्या गेमिंग आणि डिजिटल उत्क्रांतीपर्यंतचा मनोहारी प्रवास, नावाजलेले स्टुडिओज, मनोरंजन उद्योगात होत असलेल्या नाविन्यपूर्ण कल्पनांमधील बदलांचा वेध घेण्यात आला आहे.

### मराठीचा वारसा

महाराष्ट्राने देशाला अनेक उत्तमोत्तम मराठी चित्रपट दिले आहेत. मूकपटांपासून ते आधुनिक उत्कृष्ट कलाकृतींपर्यंत. या प्रदर्शनात महाराष्ट्राच्या सिनेमाच्या वारशाचा गौरव करण्यात आला आहे.

### जागतिक दर्जाची निर्मिती

महाराष्ट्रात जागतिक दर्जाचे व्हीएफएक्स, ॲनिमेशन आणि पोस्ट-प्रॉडक्शन स्टुडिओ आहेत. गाजलेल्या चित्रपटांपासून ते ओटीटी मालिकांपर्यंत निर्मिती होत असलेल्या या स्टुडिओंची माहिती येथे देण्यात आली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने निर्मिती झालेल्या आणि जागतिक स्तरावर गौरव प्राप्त झालेल्या चित्रपटांचा या प्रदर्शनात सन्मान करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैविध्य, शास्त्रीय संगीत, नृत्यापासून गणेशोत्सवासारख्या सणांपर्यंतची समृद्ध परंपरा जगप्रसिद्ध आहे. याबाबतही या दालनात विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

महाराष्ट्र डिजिटल क्रांतीच्या अग्रभागी आहे, येथे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सृजनशीलता यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो. एआय-आधारित जाहिरातींपासून येथील क्रिएटिव्ह स्टुडिओजमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जाहिरात निर्मिती देखील करण्यात येते. यांच्यासह महाराष्ट्रातील चित्रीकरण स्थळांबाबतची माहिती या दालनाच्या माध्यमातून देण्यात आली आहे.

पान १ वरून

# उद्योजक होण्यासाठी यशाची...

मिलिंद बारापत्रे व सहाय्यक सुनील खोजनाळे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी प्र.कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, प्रभाकर कोळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. तर नव उद्योजक जितेंद्र बाजारे, रेश्मा जाधव यांनी अनुभव कथन केले.

सुरेश पवार सांगोला, शेखर घोंगडे मंगळवेढा, नवनाथ येवले, गणेश गायकवाड माढा, धनंजय सोलापुरे करमाळा, केतन शिंदे, महेश वाकडे सांगोला, शंकर टोणपे माढा, धनाजी जमदाडे माळशिरस, नानासाहेब पवार माढा, विलास गाडे, वैभव पोळ करमाळा, निशा गायकवाड माळशिरस, रतिलाल नवले माढा, दीपक देशमुख करमाळा, राजेंद्र इंगळे माण, संदीप घाडगे, रूपाली पवार माळशिरस, महेश पाटील माढा, अभिजीत पाटील करमाळा, समीर मुलाणी, सांगोला, किरण लोकरे, माढा. राहुल जगदाळे, माण नवनाथ कसपटे, बार्शी, करण सिन्हा, माण या उद्योजकांना खासदार नवउद्योजक पुरस्काराने खा. धैर्यशील मोहिते पाटील व शितलदेवी मोहिते पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# दिलीप माने की सुरेश हसापुरे?...

होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. सभापती व उपसभापतीची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### निवडीचा मिनीट टू मिनीट कार्यक्रम

रविवार, ११ मे रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभा होईल. यात सकाळी ११.१० ते ११.२५ या वेळेत उमेदवारी अर्ज वाटप व स्वीकृती, सकाळी ११.३० वाजता उमेदवारी अजार्ची छाननी, ११.३५ वाजता वैध उमेदवारी अर्जांची यादी प्रसिध्द करणे, ११.४५ वाजता उमेदवारी अर्जाची माघार, आवश्यकता असल्यास दुपारी १२ वाजता मतदान व त्यानंतर लगेच निकाल घोषित केला जाणार आहे, असे सोलापूर बाजार समितीचे सचिव दत्तात्रय सूर्यवंशी यांनी काढलेल्या सभेच्या अधिसूचनेत म्हटले आहे.

# स्पर्धात्मक युगात 'ए.आय.'चा वापर गरजेचा चर्चासत्रात तज्ज्ञांचा सूर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (ए.आय.) टूल्सचा आता प्रत्येक क्षेत्रात वापर होत आहे. ए.आय. टूल्स शिकण्यास अतिशय सोपे असून यापुढे प्रत्येक क्षेत्रात 'ए.आय.'चा वापर केल्यास आपल्या क्षेत्रात काम करणे सोपे जाईल, असे मत चित्रपट निर्मितीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या निर्मात्यांच्या चर्चासत्रामधे व्यक्त करण्यात आले. जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित 'वेव्हज परिषदे'मध्ये 'चित्रपट निर्मितीमध्ये ए.आय. कसे परिवर्तन घडवित आहे' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रात व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलचे उपाध्यक्ष चैतन्य चिंचलीकर, न्यूरल गॅरेजचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार नाटेकर, चित्रपट निर्माता राघवेंद्र नाईक यांनी सहभाग घेतला. या चर्चासत्रात 'ए.आय.'चा चित्रपट निर्मितीतील वापराबाबत चर्चा करण्यात आली. 'ए.आय.'च्या सहाय्याने पटकथा, संवाद लिहिणे अधिक वेगवान बनले आहे. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्हिज्युअल इफेक्ट्स अधिक वास्तवदर्शी आणि कमी खर्चात तयार करता येतात.

वात्रटिका

### शिकवणी प्रितीची

शिक्षणातील शिकवणी
भलत्याच वळणावर गेली...
शिकविणारी मॅडमच
विद्यार्थ्याबरोबर पळून गेली...
जीवनाच्या अभ्यासक्रमात
कोणता धडा शिकवला जाईल...
कलियुगात कोणाचा जीव
कुणावरही जडला जाईल...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून काम करणारे कामगार- आ.नारायण पाटील

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून काम करणारे कामगार नेते स्वर्गीय सुभाष आण्णा सावंत यांच्या जनसेवेचा वारसा सावंत कुटुंबाने जपण्याचे काम केले असल्याचे मत आमदार नारायण आबा पाटील यांनी व्यक्त केले.

हमाल पंचायत चे संस्थापक अध्यक्ष, माजी जिल्हा परिषद सदस्य व आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक सुभाष आण्णा सावंत यांची 74 वी जयंती 1 मे रोजी 'हमाल भवन' येथे सुभाष आण्णा सावंत यांच्या प्रतिमेचे पूजन आमदार नारायण आबा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम करमाळा तालुका हमाल पंचायतचे वतीने आयोजित करण्यात आले होते. यामध्ये पांजरपोळ येथील गोशाळेला चारा वाटप करणे, उपजिल्हा कुटीर रुग्णालयात फळे व खाऊ वाटप करणे तसेच नागरिकांसाठी आरोग्य शिबिर मध्ये शुगर, बीपी, हिमोग्लोबिन आणि हृदयरोग रुग्णांची ईसीजी करून तपासणी करण्यात आली तसेच गरजेनुसार मोफत गोळ्या व औषध देण्यात आले.

यावेळी या आरोग्य शिबिराचे उद्घाटन संचालक डॉ. वसंतराव पुंडे, डॉ. हरिदास केवारे, संचालक राजाभाऊ कदम, डॉ. बाबुराव लावंड, गोपाळ बापू सावंत, दादासाहेब सावंत, चेअरमन प्रभाकर शिंदे, सरपंच अंकुश शिंदे, संचालक विठ्ठल शिंदे, नगरसेवक गोविंद किरवे, चेअरमन मनोज गोडसे, पत्रकार दिनेश मडके, सचिव नरेंद्रसिंह ठाकूर, पत्रकार जयंत दळवी, विशाल घोलप, अशोक मुरूमकर यांच्या उपस्थितीत केले.

यावेळी जयंती निमित्त पुढे बोलताना आमदार नारायण आबा पाटील म्हणाले की, स्वर्गीय सुभाष आण्णा सावंत हे सर्वसामान्य परिस्थितीमध्ये संघषार्तून तावून सुलाखून तयार झालेले नेतृत्व होते. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी त्यांनी प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून दिला. त्यामुळे जनतेने त्यांना हमाल पंचायत चे संस्थापक अध्यक्ष, आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक, जिल्हा परिषद सदस्यपदी त्यांना काम करण्याची संधी दिली. माझ्या राजकीय जीवनाची सुरुवातही सुभाष आण्णा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली झाली असून आमचे वडील स्व.गोविंद बापू पाटील यांच्या पासून सावंत कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते आहे. सुभाष आण्णा सावंत यांच्या निधनानंतर सावंत गटाची यशस्वी धुरा सांभाळून त्यांचे बंधू विठ्ठल आप्पा सावंत, भगवान सावंत यांनी त्यांचे काम चालू ठेवून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम ते करत आहे. त्यांची पुढील पिढीही समाजकारणातून राजकारणात यशस्वी वाटचाल करीत आहेत. सुभाष आण्णा यांचे सुपुत्र ॲड. राहुल सावंत यांनी पंचायत समिती सदस्य, जिल्हा नियोजन समिती सदस्य, हमाल पंचायत अध्यक्ष म्हणून यशस्वी काम केले असून सध्या त्यांची आदिनाथच्या संचालकपदी निवड झाली आहे. पुतणे संजय उर्फ पप्पू सावंत हेही नगरसेवक म्हणून करमाळा शहराची सेवा करत आहे तर पै. सुनील बापू सावंत ही सावंत गटाच्या माध्यमातून समाजसेवेचा वसा जपून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यरत आहे. सर्वसामान्यांच्या सुख दुःखामध्ये सामील होऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न तंटे सोडवत खऱ्या अर्थाने जनसेवेचा वसा जपून सुभाष आण्णा सावंत कार्य पुढे नेण्याचे काम हे कुटुंब करीत आहे. गोरगरीबांच्या सुख दुःखात सहभागी होऊन तसेच सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन कौटुंबिक जिव्हाळा जपण्याचे काम करीत आहेत. कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्व यांचा अनोखा संगम असलेले आजच्या युगामध्ये सावंत कुटुंब हे खऱ्या अर्थाने आदर्श कुटुंब असून ते करीत असलेले काम बघून स्वर्गात सुद्धा आण्णांना आनंद वाटत असेल असे गौरव उद्गगार आमदार नारायण पाटील यांनी काढले.



कामगार नेते सुभाष आण्णा सावंत यांच्या 74 व्या जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर प्रसंगी सुनिल बापू सावंत, संचालक डॉ. अमोल घाडगे, अँड बलवंत राऊत, उद्योगपती योगेश गानबोटे, राजू शियाळ, देवा लोंढे, ॲड. सुहास मोरे, रामकृष्ण माने, अशोकराव ढवळे, डॉ. गादिया, डॉ. अनुप खोसे, डॉ. संकेत सावंत, डॉ. दिपक केवारे व मान्यवर उपस्थित होते.

तसेच रुग्णांना फळे व खाऊ वाटप प्रसंगी चेअरमन प्रभाकर शिंदे, पाराजी शिंदे, सरपंच भोजराज सुरवसे, विलास रोडगे, देवीदास फुंदे, संचालक वालचंद रोडगे, सरपंच बाळासाहेब काळे, सुभाष जाधव, सरपंच आजिनाथ भागडे, ॲड . प्रशांत बागल, छगन शिंदे, सुभाष शिंदे, हरिदास मोरे व मान्यवर उपस्थित होते.

तसेच गोशाळेत मुक्या जनावरांना हिरवा चारा वाटप प्रसंगी नगरसेवक संजय सावंत, सरपंच भाऊसाहेब काळे, सरपंच धनंजय शिंदे, हनुमंत काळे महाराज, सचिन काळे, नगरसेवक मनोज राखुंडे, नगरसेवक फारूक जमादार, अल्लाउद्दीन शेख, सरपंच महादेव वायकुळे, भागवत वाघमोडे, सतीश मोटे व मान्यवर उपस्थित होते.

तसेच श्री रामाच्या वनवासाला निघालेले वीट येथील श्रीराम भक्त वनवासी यांनी आण्णांना अभिवादन करून भजन, अभंग, भक्तीगीत गाऊन आण्णांच्या प्रती त्यांच्या स्मृतीस उजाळा दिला.

अशा विविध सामाजिक उपक्रमाद्वारे स्वर्गीय सुभाष आण्णा सावंत यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी संचालक डॉ. वसंतराव पुंडे, सरपंच निवृत्ती सुरवसे सर, नगरसेवक ॲड. नवनाथ राखुंडे, पत्रकार नानासाहेब घोलप, अशोक काळे, भीमराव लोंढे आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी बागल गटाचे नेते श्री दिग्विजय बागल, मार्गदर्शक विलासराव घुमरे सर, माजी सभापती गहीनीनाथ ननवरे, जिल्हा परिषद माजी सदस्य बिभीषण नाना आवटे, राष्ट्रवादी अध्यक्ष संतोष वारे, माजी संचालक शशिकांत केकाण, मा संचालक प्रकाश झिंजाडे, मा सरपंच बिभीषण खरात, सरपंच दौलत वाघमोडे, चेअरमन वंदन नलवडे, ॲड.नानासाहेब शिंदे, मा नगराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, वैभव मुरूमकर, संतोष वाळुंजकर, चेअरमन शहाजी शिंगटे, काशिनाथ नलवडे, विलास नलवडे, सरपंच रंजीत मोरे, भगवान भोई, व्यापारी मनोज पितळे, मयूर दोशी, उत्कर्ष गांधी, मयूर देवी, प्रीतम गादिया, विलास जाधव, पत्रकार महेश दादा चिवटे, अशोकराव नरसाळे, नासीर कबीर, राजेश गायकवाड, मुस्तकीन पठाण, सोहल पठाण, आण्णा सुपनवर, सूर्यकांत भाऊ पाटील, शिंगटे सर, मा उपसभापती दत्तात्रय अडसूळ, श्रीकांत घोलप, कमलाकर घोलप, महेंद्र शिंदे, तात्या जाधव, चेअरमन चंद्रकांत काळे, बोरगाव चे संजय शिंदे, एच.आर.पाटील, विजय सुपेकर, सचिन गायकवाड, पै. दादा इंदलकर, बापू बेंद्रे, रावसाहेब शिंदे, आबा वारे, गणेश अंधारे, भरत नलवडे, भाऊसाहेब जाधव, अतुल मुरूमकर, अतुल शिंदे, रोहित सोरटे आदि मान्यवर उपस्थित होते.


नि:.७

जाहिर प्रसिध्दीकरण दिवाणी किरकोळ अर्ज नं. १०/२०२५

मोहोळ येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो, यांचे कोर्टात

१) लता कृष्णा कटारे (लग्नापुर्वीचे नांव) लता श्रीपाद नवले (लग्नानंतरचे नांव) वय-४५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. इरफान बेकरी पाठीमागे, ३०/३१ संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर, जि. सोलापूर.

२) नितीन श्रीकृष्ण कटारे, वय-४३ वर्षे, धंदा-टेलरिंग व्यवसाय, रा. पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर. अर्जदार

३) चेतन श्रीकृष्ण कटारे,वय-३८ वर्षे, धंदा-मजुरी, रा.सुमित्रा नगर, (शिक्षक कॉलनी), यशवंत नगर, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर. हल्ली रा.पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर.

विरुध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ३ यांनी मयत कृष्णा नारायण कटारे व मयत शोभा कृष्णा कटारे यांचे वहिवाटीची असलेली मौजे पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील ग्रामपंचायत हद्दीतील अ.क्र.८८९ व मालमत्ता क्र. ६०९ यांसी क्षेत्रफळ १०१२ चौ. फुट ही ग्रामपंचायत मिळकतीस मयत कृष्णा नारायण कटारे व मयत शोभा कृष्णा कटारे कायदेशीर वारस अर्जदार नं.१ ते ३ यांच्या नावाची नोंद दाखल करण्यासाठी लिगल हेअर सर्टीफिकेट मिळणेसाठी या मे.कोर्टात वरील नंबरप्रमाणे अर्ज केला आहे.

त्याअर्थी वरील मागणी बाबत जर कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी सदर अर्जाचे कामी या मे. कोर्टात सदरचे प्रसिध्दीकरण झालेपासून ३० दिवसाचे आत स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वकिलामार्फत नेमलेली ता. २१/०६/२०२५ रोजी हजर होवुन त्यांचे म्हणणे सादर करावे, जर मुदतीत कोणाची काही हरकत, न आल्यास सदर अर्जाचे कामी पुढील योग्य ते आदेश केले जातील, यांची नोंद घ्यावी.

जाहिर प्रसिध्दीकरण केले असे ता. ०३/०५/२०२५

लिपीक सि.ज.ज्यु.डि.मोहोळ | शिक्का | न्यायालय अधिक्षक सि.ज.ज्यु.डि.मोहोळ



## जाहिर प्रसिध्दीकरण

नि .०५ दि.कि.अर्ज क्र- ३५४/२०२५

**सोलापूर येथील मे दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. ( श्रीमती चव्हाण पी व्ही साहेब) यांच्या कोर्टात**

१) श्रीमती महादेवी नारायण गुळेद वय ६७ वर्ष धंदा घरकाम २) चंद्रकांत नारायण गुळेद वय- ४४ वर्ष धंदा - नोकरी अर्जदार ३) सचिन नारायण गुळेद वय - ३९ वर्ष धंदा- नोकरी } **अर्जदार**
सर्व रा. - १३१ अ / २४ आशीर्वाद नगर लक्ष्मी पेठ, सोलापूर.

**विरूध्द**
कोणी नाही } **सामनेवाला**

ज्यार्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणे करता दाखल केलेला आहे, मिळकतीचे वर्णन - १ ) डी व सब डी सोलापूर पैकी तालुका उतर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका १३१ अ / २४ / २९ टी. पी ४, आशीर्वाद नगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर मधील प्लॉट एकूण क्षेत्र ४८५.७५ चौरस मी., २) कसबे सोलापूर महानगरपालिका हद्दीतील स. नं - २१८, प्लॉट नं - ८६, बांधलेली, सोलापूर -१ एकूण क्षेत्र २८७.८० चौरस मी., ३) तालुका उतर सोलापूर पैकी कसबे सोलापूर मजरेवाडी हद्दीतील स. नं - २३३ / १ अ, सब प्लॉट न -१२६, बांधलेली , सोलापूर -१ एकूण क्षेत्र २५०.९ चौरस मी. ४ ) तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी हद्दीतील गट न.५०६, स. नं - २५१, राजश्री नगर मधील प्लॉट न - ६६,, सोलापूर - १ एकूण क्षेत्र ९१.०७ चौरस मी. इतकी आहे, हे कै. नारायण चंदप्पा गुळेद यांच्या मालकीची होती, कै नारायण चंदप्पा गुळेद यांच्या हिश्याची जमीन मध्ये अर्जदार क्र - १ हे कै. नारायण चंदप्पा गुळेद यांची पत्नी आहे, आणि अर्जदार क्रमांक २ व ३ हे त्यांचे पुत्र आहे, कै. नारायण चंदप्पा गुळेद यांचे निधन दिनांक २५/०१/२०१९ रोजी सोलापूर येथे राहत्या घरी झाले आहे, त्यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत, सदर मिळकतीची अंदाजे शिलक रक्कम रु ११,००,०००/- रुपये आहे. येणेप्रमाणे वरील नमूद मिळकती मध्ये अर्जदार यांचे वारसांचा नावांची नोंद होणे कामी वारसा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देणे संबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेले तारीख २०/०६/२०२५ रोजी, मे . कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र कोणाची काहीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. हैं जाहीर नोटीस माझ्या सहीनीशी व मे कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे.

**तारीख : ०३/०५/२०२५**
**लिपीक**

शिक्का

**हुकूमावरून**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश व.स्तर सोलापूर**


# मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने खतना कॅम्प संपन्न; १३५ मुस्लिम बालकांचा सहभाग

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** दरवर्षी प्रमाणे यंदाही मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने मुस्लिम समाजातील लहान बालकांसाठी खतना शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १३५ लहान बालकांनी लाभ घेतला असून सोलापूर चे प्रसिद्ध खतना स्पेशालिस्ट डॉ.उजेर बेग यांच्या हस्ते खतना करण्यात आल्या असल्याची माहिती मुस्लिम विकास परिषदेचे अध्यक्ष फारुक जमादार यांनी दिली.

प्रारंभी मौलाना मोहसीन शेख, मौलाना सिकंदर मुलाणी,



बकशभई शेख, अल्लाउद्दीन शेख, मोहसीन नालबंद,जमीर मुलाणी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, हाजी हमीद सय्यद, अहमद बागवान यांच्या प्रमुख उपस्थितीत कुराण पठण करुन व प्रार्थना करुन खतना शिबीरास सुरुवात करण्यात आली यावेळी समीर सिकंदर शेख, असीम फिरोज बेग, जावेद दाऊद शेख आदी ची प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी मौलाना मोहसीन शेख म्हणाले की, इस्लाम धर्मात खतना ला विशेष महत्त्व आहे मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने दरवर्षी शिबिर आयोजित करून समाजातील बालकांची उत्तम सोय करण्याचे काम या माध्यमातून होत असुन या मध्ये मोठ्या प्रमाणात पैशाची बचत होते. समाजातील गोरगरीब बालकांसाठी अश्या प्रकारे शिबिर राबविण्याची सध्या गरज आहे यापुढे ही असेच सामाजिक उपक्रम राबविले जावेत असे ते यावेळी म्हणाले. या खतना शिबीरास नगरसेवक संजय (पप्पू) भगवान सावंत, मंडळ अधिकारी युसुफ बागवान, अशपाक सय्यद, हाजी नादीर नालबंद, हाजी कदीरभाई शेख, आदी जणांनी भेट दिली.

खतना कॅम्प यशस्वी करण्यासाठी चॉंद हाजी फारुक बेग,अकीब सय्यद, फिरोज बेग, पै. साहील शेख, शाहरुख शेख, आफताब पठाण, अरबाज बेग, नदीम शेख, नवाज बेग, जिशान शेख, शाहिद बेग, जमीन सय्यद, समीर दाऊद शेख,जाहीद शेख, हुजेफ कलंदर शेख, हुजेफ जावेद शेख यांनी परिश्रम घेतले.

# सामजिक भावना आणि विचार मांडण्याचे लघुपट हे प्रभावी माध्यम

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** लघुपट हे मनोरंजनाचे माध्यम नाही तर सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनातील भावना आणि विचार प्रभावी मांडण्याचे प्रभावी माध्यम आहे,असे मत प्रसिद्ध लेखक आणि दिग्दर्शक वयाचेच्लाव गुज यांनी व्यक्त केले.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन परिषदेत 'Connecting Creators, Connecting Countries' या चर्चासत्रात ते बोलत होते.

गुज म्हणाले, सामजिक जीवनात आपल्याला येणाऱ्या वेगवेगळ्या अनुभवातून प्रत्येकाच्या मनात एक लघुपट (शॉर्ट फिल्म) तयार असतो, फक्त त्याला मूर्त स्वरूप देण्याची गरज असते. डिजिटल माध्यमामुळे आता ही प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. आजच्या तरुण कलावंतांमध्ये लघुपट निर्मितीकडे अधिक कल वाढला आहे. लघुपटाचे यश विषयापेक्षा त्यामागील भावना आणि आशय प्रेक्षकांपर्यंत नेमकेपणाने पोहोचविण्यात असते असे त्यांनी सांगितले. यावेळी विविध विषयांवर लघुपट दाखविण्यात आले.


## Classified - छोटी जाहीरात

## विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..



(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


# भावाला न्याय मिळत नाही तोपर्यंत चप्पल घालणार नाही

**पंढरपूर, (कटुसत्य वृत्त):-** अत्यंत क्रूरपणे सरपंच संतोष देशमुख यांची झालेली हत्या आजही अनेकांच्या अंगावर काटा आणते. आज उन्हात फिरताना मला त्रास होत आहे मग संतोषला किती यातना झाल्या असतील. असे म्हणून डोळ्यात पाणी आणून त्यांची बहीण प्रियंका चौधरी यांनी जोपर्यंत भावाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आपण चप्पल घालणार नसल्याचे पंढरीत सांगितले.

श्री विठ्ठल रूक्मिणीच्या दर्शनासाठी सरपंच संतोष देशमुख यांची बहीण प्रियंका चौधरी यांचे कुटुंबीय पंढरीत आले होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना चौधरी यांनी, माझ्या भावाची ९ डिसेंबरला हत्या झाली होती. तेव्हापासून मी चप्पल सोडली आहे. आज मला चप्पल न घातल्यामुळे खूप त्रास होत आहे, मग संतोषला किती यातना झाल्या असतील अशी आठवण काढून त्या रडू लागल्या होत्या. म्हणून मी विठुरायाला साकडे घातले आहे की माझ्या भावाला न्याय मिळू दे. यामुळे त्याची मुले किमान चांगले शिक्षण घेतील. सरकारवर आमचा विश्वास आहे. परंतु संतोषला न्याय मिळाल्याशिवाय मी चप्पल घालणार नसल्याचा निर्धार केला असल्याचे प्रियंका चौधरी यांनी सांगितले.




# डिजिटल माध्यमांसाठी नाविन्यता आणि सातत्य आवश्यक

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** स्पर्धात्मक डिजिटल युगात स्वतःचे वेगळेपण जपण्यासाठी चांगली संहिता, विषयांची प्रभावी मांडणी, व्हिज्युअलचा योग्य वापर याबरोबरच नाविन्यता आणि सातत्य असणे आवश्यक असते, असे मत सोशल मीडिया इन्फ्लुएंसर व कंटेंट क्रिएटर डॉली सिंग यांनी व्यक्त केले.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधील जिओ वर्ल्ड सेंटर येथे जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन परिषदेत "Connecting Creators, Connecting Countries" या चर्चासत्रात त्या बोलत होत्या. यावेळी देश-विदेशातील नामवंत सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आणि लोकप्रिय कंटेंट क्रिएटर सहभागी झाले होते.

डिजिटल माध्यमात आपली ओळख निर्माण करण्यासाठी करण्यासाठी प्रेक्षकांशी संवाद साधणे आणि त्यांच्या प्रतिसादाला उत्तर देणे तेवढेच महत्वाचे आहे. यामध्ये नाविन्यता आणि नियमित दर्जेदार मजकूर अपलोड करणे गरजेचे असते,असे श्रीमती सिंग यांनी यावेळी सांगितले. सोशल मीडियावरील पोस्टसाठी आवश्यक व्हिडिओ, मजकूर, विषय मांडण्याची पद्धत, संपादनाची शैली आणि सादरीकरणाची पद्धत हे सर्व घटक वेगळेपण सिद्ध करतात. तसेच कोणतीही प्रसिद्धी करण्यापूर्वी सोशल मीडियावर शॉर्ट व्हिडिओ, टीझर किंवा ट्रेलर प्रसिद्ध करणे आवश्यक असते तरच त्या इव्हेंटबाबत उत्सुकता निर्माण होते आणि प्रेक्षक जोडले जातात असे सांगून डॉली सिंग यांनी स्वतःच्या अनुभवातून कंटेंट निर्मितीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) शाहरूखचा हिंदी चित्रपट, श्रीमंत (हिंदीत) २) भारतीय क्रिकेट टीमचे प्रशिक्षक-राहुल *** ३) दूध संकलनाचे ठिकाण ४) राजस्थान मधील एक जात ५) महाराष्ट्रातील भाजपचे एक नेते ६) कमा उलट लिहा ७) असह्य वेदना, त्रास ११) पक्षाचा जाहीरनामा १२) होडी, नौका १४) खरे (हिंदीत) १५) राशीचक्रातील एक रास १६) अमेरिकेचे एक माजी राष्ट्राध्यक्ष १७) एखाद्याच्या बाजूने दिलेली ग्वाही २०) हेळसांड, दुर्लक्ष २३) भारतीय माजी विकेटकिपर- साबा ***२५) ध्येयपूर्तीकरता या गोष्टी पणाला लावतात-** ** ** २६) आमदारांचे सभागृह २८) श्रीकृष्णाची कपटी मावशी ३१) इंग्रजी मुळाक्षरातील एक अक्षर ३४) कमी जास्त नसणे, बरोबर ३७) हिंदी चित्रपट निर्माता- ** चोप्रा ३८) किमानच्या विरूध्दार्थी, आश्चर्य ३९) होकारच्या विरूध्दार्थी ४०) भिंतीवरून सरपटणारा सरड्याप्रमाणे जीव ४२)लक्ष वेधण्यासाठी केलेला विचित्र हावभाव ४४) श्रीलक्ष्मी, विष्णूपत्नी ४५) निवडणुकीत उमेदवाराला देतात ते व्होट ४६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे

**आडवे शब्द :** १) भारतीय क्रिकेट टीममधील एक अष्टपैलू खेळाडू ५) विमान उतरण्याची जागा ८) शर्थ, निर्बंध ९) सेवक, चाकर १०) मोकळा वेळ १२) आवड, छंद १३) शपथ (हिंदीत) १७) एक संत-*** माळी १८) याचना करणारा, मागणारा १९) नगरपालिका प्रमुख २१) लग्नानंतर नवरा-नवरीची काढलेली मिरवणूक २२) नेता, प्रमुख, अनिल कपूरचा एक चित्रपट २३) गोलाकार रांग, बाजूला २४) मुलाची मुलगी २६) इंन्श्युरन्स (मराठीत) २७) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता २९) फळातील बीज ३०) जुनाच्या विरूध्दार्थी ३२) फळांचा राजा ३३) इच्छा (हिंदीत) ३४) वेळ (हिंदीत) ३५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना ३६) पत्राच्या सुरूवातीचा मजकूर ३८) स्वागतासाठी उभारतात ती, अर्धवर्तुळाकार ४१) कामाचा दिला जाणारा आर्थिक मोबदला ४३) गुणाकारच्या विरूध्दार्थी ४५) तलम सुती कापड ४७) बोटाच्या पुढील टणक आवरण ४८) सचिन तेंडुलकरचे गुरू -**** आचरेकर

## सुडोकु - 241

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. या सादरीकरणासाठी पर्यवेक्षक म्हणून डॉ. सुमन देवरूमठ (प्राचार्य, विद्याप्रतिष्ठान कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय बारामती) व डॉ. रोहिणी कोळेकर (प्रकल्प समन्वयक, विद्याप्रतिष्ठान कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय बारामती) हे लाभले होते. डॉ. सुमन देवरूमठ यांचे स्वागत लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांच्या हस्ते व डॉ. रोहिणी कोळेकर यांचे स्वागत प्रा. सायली बडेकर यांच्या हस्ते पुष्पुच्छ देऊन करण्यात आले.

या प्रकल्प सादरीकरणात विद्यार्थ्यांनी कृषीजैवतंत्रज्ञान व एन्टरप्रिन्युरशीप डेव्हलपमेंट इन बायोटेक्नॉलॉजी अंतर्गत विविध विषयांवर त्यांचे प्रकल्प सादर केले. प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने विविध पिकांचे टिश्यू कल्चर, सूक्ष्मजीवशास्त्र तंत्रज्ञानाचा वापर करून जनुकीय विविधता व पिकांचे संकर ओळखणे आदींचा समावेश होता. या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने अंजीर, केळी, बांबू, डाळिंब, संत्रा, द्राक्षे, सिंगोनियम, जरबेरा, साग, गहू, कांदा, ज्वारी, तूर, भात, मूग, मकाआदी पिकांचा समावेश होता. विद्यार्थांना कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात ऊती संवर्धन व सूक्ष्मजीवशास्त्राचा वापर करुन पिकांची जैवविविधता कशाप्रकारे तपासली जाते, त्याचा वापर कशाप्रकारे पिकांच्या विविध जाती विकसित करण्यासाठी केला जातो, पिकांमध्ये संशोधन कशाप्रकारे केले जाते याविषयी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून प्रात्यक्षिकांद्वारे अनुभवता आले. या कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. सायली बडेकर यांनी व सूत्रसंचालन सोहम बोधले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यायाचे प्राचार्य सागर महाजन, प्रा. सायली बडेकर, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. अंकिता पवार व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# दि ओन्ली अण्णा चषक : वीर मराठा संघ ठरला मानकरी

## आदर्श क्रिकेट क्लब संघ उपविजेता



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे कार्यसम्राट मा.नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विजापूर रोडवरील नेहरूनगर येथील शासकीय क्रीडांगण येथे २७ एप्रिल ते १ मे दरम्यान ईच्छा भगवंताची परिवार आणि नागेश अण्णा गायकवाड युथ फाऊंडेशनच्या वतीनं भव्य डे नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य डे नाईट क्रिकेट स्पर्धेमध्ये १८ संघांनी सहभाग नोंदविला होता. दरम्यान सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे दमदार आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत अंतिम फायनल सामन्यांची नाणेफेक करण्यात आली. फायनल मॅच मध्ये सोलापूर येथील वीर मराठा संघ मानकरी ठरला तर वैराग येथील आदर्श क्रिकेट क्लब हा उपविजेता संघ ठरला तर सोलापूर येथील ईसा इलेव्हन संघाने तिसरा क्रमांक पटकाविला. दरम्यान आमदार देवेंद्र कोठे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, माजी नगरसेवक मनोज शेजवाल, गुरुशांत दुत्तरगावकर, किरण चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, आदींच्या उपस्थितीत विजेता संघास पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते सोलापूर येथील वीर मराठा संघास ८१,१११ रुपये रोख आणि चषक देण्यात आले तर वैराग येथील आदर्श क्रिकेट क्लब या उपविजेता संघास ४१,११ रुपये आणि चषक देण्यात आले तर तिसरा विजेता ईसा इलेव्हन संघास २१,१११ रुपये रोख आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले. दरम्यान उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांनी केले. वाढदिवसाला क्रिकेट चषक जिंकणे ही एक आनंदी आणि विशेष घटना असू शकते अनेकदा स्थानिक क्रिकेट क्लब किंवा मित्रमंडळाने वाढदिवसाला खास स्पर्धा आयोजित करतात आणि यात जिंकणे एक घास अनुभव असतो काही वेळा व्यक्तीच्या नावावरून किंवा आवडीनुसार खास क्रिकेट स्पर्धा आयोजित केली जाते आणि जिंकणारा मानकरी बनतो कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून खेळाडूंना प्रोत्साहन आणि संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य त्यांच्या मित्र परिवाराने केला आहे त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मनोगत यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी व्यक्त केलं. दरम्यान यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत नागेश गायकवाड यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नागेश अण्णा गायकवाड युथ फाऊंडेशनच्या इनोग्रेशन सोहळा पार पडला. या क्रिकेट स्पधेर्चे समालोचन शंकर पवार डान्सिंग अंपायर म्हणून सोन्या बापू भोसले यांनी उपस्थिती लावली.

या भव्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट फलंदाज उत्कृष्ट गोलंदाज आणि मालिकावीर स्पर्धकास रोख रक्कम आणि चषक वितरण करण्यात आले.सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नागेश अण्णा गायकवाड युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष अमोल जगताप चेतन गायकवाड दर्शन दुबे, प्रेम गायकवाड, कार्तिक जाधव, किरण शिंदे, दर्पण दुबे, सनी पोळ, नवीन चिंता, दिनेश आवटे, ऋषी येवले, सौरभ पातळे, सोनू पटेल, सोनू जाधव, पियुष गायकवाड, अजिंक्य जाधव, उत्कर्ष गायकवाड, आदर्श जाधव, पियुष गायकवाड यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी आणि सदस्यांनी परिश्रम घेतले

# ऑनलाईन चक्री गेम (जुगार) बंद करण्याची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विजापूर नाका पोलीस स्टेशन हद्दीत आसरा चौक, मंगल रेसीडेंन्सी येथे (पेट्रोलपंप समोर) ऑनलाईन चक्री गेम (जुगार) एक महिन्यापासून सुरु आहे. ती चक्री गेम त्वरीत कायमस्वरूपी बंद करण्यात यावी व संबंधित एजंटावर त्वरीत गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. गेलेले पैसे परत येतील या आमिषापोटी कामागर व युवक वर्ग जुगार खेळत आहेत.नुकतेच कुडुर्वाडी येथील एका शेतक-याचे या चक्री गेम मध्ये शेतजमीन, ट्रॅक्टर, सोने, रोख रक्कम, अशी एकूण ९० लाख रुपये चे न भरुन येणारे नुकसान झाले आहे. त्याचे घर उध्दवस्त झाले असतांना सोलापूर मध्ये ह्या चक्री गेम ने शिरकाव केला आहे.

सोलापूरात एकीकडे बेकारी खुप वाढलेली असतांना १० ते १२ तास कुठेतरी मोलमजुरी करून कामगार हे घराच्या उदरनिर्वाहासाठी पैसे जमा करतात परंतु अशा चक्री गेमच्या नादात सर्व कष्टाची कमाई गमावून बसतात.एका मिनिटात रिझल्ट येणारी ही चक्री गेम लोकांना बर्बाद करीत आहे. ह्या जुगाराच्या जाळयात युवा वर्ग तसेच कामगार वर्ग बर्बाद होत आहे.

या चक्री गेम चालविणा-या एजंटवर त्वरीत गुन्हा दाखल करुन चक्री गेमचा जुगार कायमस्वरूपी बंद करण्यात यावा. अन्यथा कामगार संघटनेच्या वतीने शेकडो लोकांसह तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सायबण्णा तेग्गेळी यांनी निवेदनाद्वारे दीला आहे.

# जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचा सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात जल्लोषात साजरा



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणनेची घोषणा करून सर्व समावेशक धोरणाचा नवा अध्याय सुरू केला आहे. या निर्णयाचा सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील १४ मंडलात पेढे वाटून जल्लोष साजरा केला असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणनेची घोषणा केली आहे. ही जनगणना शैक्षणिक व सामाजिक आरक्षण धोरणांना अधिक न्याय बनवेल हा विश्वास आहे. हा निर्णय सामाजिक न्यायाच्या दिशेने भारताने सकारात्मकतेने टाकलेले पाऊल आहे. या निर्णयाचा भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण जिल्ह्याच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येत्या काळात केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे येत्या काळात विविध जातसमुहाच्या आधारावर आरक्षणाचा निर्णय घेणे केंद्र सरकारला सोपे होणार आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या धाडसी निर्णयामुळे येत्या काळात देशातील विविध जातीची नेमकी संख्या व त्यांची स्थिती समजण्यास मदत होणार असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

# करकंब येथे मोफत पाणपोईचे उद्घाटन




**माढा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र दिन व कामगार दिनांचे औचित्य साधून करकंब येथील पै.सुभाष गुळमे मित्र मंडळ व कलासिंधू फार्म मार्फत थोरली वेस कलकंब येथे मोफत पाणपोईचे उद्घाटन प्रा.प्रदिप पाटील व निवृत्त पोलिस अधिकारी बिरुदेव पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. करकंब येथे मोठी बाजारपेठ असून कामानिमित्त आलेल्या वाटसरुंना कडक उन्हाळ्यात थंडगार पाणी पिऊन आपली तहान भागवता येणार आहे.माढा तालुक्याचे आमदार अभिजित आबा पाटील यांच्याबरोबर सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करणारे व कट्टर समर्थक पै.सुभाष गुळमे व कलासिंधू फार्मचे धनंजय गुळमे यांनी उन्हाचा तडाका वाढत असताना मोफत पाणपोई सुरु केल्यामुळे त्यांच्या सामाजिक कायाचे सर्वत्र कौतुक होत आहे.याप्रसंगी पै. सुभाष गुळमे ,ग्रामपंचायत सदस्य संतोष धोत्रे,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अमोल शेळके लक्ष्मण वंजारी,अर्जुन शेटे प्रविण गुळमे कलासिंधू फार्मचे धनंजय गुळमे सचिन गुळमे,जयंत टकले अतुल अभंगराव नवनाथ नलवडे औदुंबर कुंभार प्रशांत व्यवहारे दत्तात्रय जाधव फिरोज तांबोळी आणि समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना महाराष्ट्र दिनी किसन जाधवांनी दिल्या शुभेच्छा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** १ मे कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुणे येथील विमानतळावर भेट घेऊन कामगार चळवळींमध्ये सर्वात मोठे योगदान असणारे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे माझी आत्माकथा पुस्तक तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावरील फकीरा पुस्तक भेट देत गुलाब पुष्प देऊन ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी त्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माणिक कांबळे महादेव राठोड आनंद गाडेकर आदींची उपस्थिती होती. दरम्यान यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या ६५ व्या वर्धापन दिनाच्या आणि कामगार दिनाच्या सर्व सोलापूर शहरवासीयांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र हे सर्वात प्रगत, पुरोगामी व सुधारणावादी विचारांचा राज्य म्हणून ओळखला जात आहे शेती, उद्योग,व्यापार, शिक्षण, आरोग्य आणि सहकार अशा सर्व क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राचे घोडदौड कायम सुरू आहे महाराष्ट्राची ओळख अबाधित ठेवण्याचा आपण दृढनिश्चय करूयात असेही यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

# सुस्ते येथे ॲडिशनल ट्रान्सफॉर्मरचे भूमिपूजन



**पंढरपूर : (कटुसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांना जादा वीज पुरवठा नियमितपणे व्हावा म्हणून अतिरिक्त ५ एमव्हीआर ट्रान्सफॉर्मर उभारण्यात येत असून या कामाचे भूमिपूजन आमदार अभिजित पाटील यांच्या हस्ते अक्षय्य तृतीयाच्या मुहूर्तावर करण्यात आले.

सुस्ते येथे असणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या सबस्टेशनमधून या अगोदर वीज पुरवठा अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.

विजेची मागणी जास्त व पुरवठा कमी होत असल्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांसहित सर्वसामान्य नागरिक व ग्राहक यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे दिसून येत होते. रखडलेल्या कामांना सुरू करून गती देणे लोकप्रतिनिधी म्हणून माझे काम करत आलो असल्याचे आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले.

यावेळी रामदास चव्हाण, तानाजी चव्हाण, तुषार चव्हाण, अतुल चव्हाण, धनाजी घाडगे, विजय सुरवसे, डीव्हीपीचे संचालक अनिल यादव, सुरेश सावंत, कुमार सालविठ्ठल, सरपंच डॉ. आबासाहेब रणदिवे, तानाजी सालविठ्ठल, अविनाश नागटिळक, अनंता चव्हाण, अजिम मुलाणी, संजय लोखंडे, तुगंत सबडिव्हीजनचे पोतदार, प्रा. शरद चव्हाण, तानाजी रणदिवे, संचालक विठ्ठल रणदिवे, नितीन सालविठ्ठल, शिवाजी शिनगारे, बाळासाहेब सालविठ्ठल, शंकर सुर्वे, तानाजी नागटिळक आदी बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# मेथवडे (सांगोला) येथे बेकायदेशीर वाळू उपसा;५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** दि. ३ मे २०२५ रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास मेथवडे (ता. सांगोला) येथील माण नदीच्या पात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा करणाऱ्या तिघांविरुद्ध सांगोला पोलिसांनी कारवाई करत ५ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. फियार्दी मारुती दत्ता पांढरे, पोलीस नाईक, सांगोला पोलीस ठाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमित मारूती लेंडवे, महेश मधुकर पवार व संदीप रामचंद्र गंगथडे (रा. मेथवडे, ता. सांगोला) यांनी शासनाची कोणतीही रॉयल्टी किंवा परवानगी न घेता, त्यांच्या ताब्यातील वाहनांद्वारे नदीपात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा करून वाहतूक केली. या दरम्यान, आयशर व एक विना नंबरचा टेम्पो जप्त करण्यात आला. दोन्ही वाहनांमध्ये अंदाजे प्रत्येकी १ ब्रास वाळू आढळली असून, एकूण मुद्देमालाची किंमत ५ लाख १४ हजार रुपये असल्याचे फियार्दीत म्हंटले आहे.

# अकलूज येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय संस्था अकलूज व वीरशैव लिंगायत समाज यांच्या वतीने महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९४ व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.त्यानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिराची सुरुवात बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन रामलिंग सावळजकर,सतीश कोरे व महालिंग राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

अक्षयतृतीया व महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती दिवशी वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणूकीची सुरवात चंद्रशेखर शेटे व सौ किर्ती शेटे या उभयतांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या उत्सवमूतीर्चे पूजन करण्यात आले व ढोल-ताशा वाद्याची मिरवणूक अकलूज शहरातून काढण्यात आली.श्री महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय संस्था ढोल ताशा पथक यांनी सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली. यामध्ये समाजातील बहुसंख्य बंधु-भगिनी सहभाग झाले होता. ही मिरवणूक महादेव मंदिर येथून निघून शिवापूर पेठ,हनुमान मंदिर, आझाद चौक, जुने एसटी स्टँड मार्गे सदुभाऊ चौक,गांधी मार्गे शेवटी महादेव मंदिर बसवेश्वर पथ येथे मिरवणूकीची सांगता झाली ही मिरवणूक अकलूजकरांची लक्षवेधी ठरली.

शेवटी अकलूज वीरशैव लिंगायत समाज यांच्या वतीने उपस्थितांना महाप्रसाद देण्यात आला.

ही जयंती पार पडण्यासाठी त्रिंबक तात्या गुळवे, नागेश नष्टे, राजू आर्वे, आण्णा आर्वे, संतोष देवशेटे, उदय शेटे, चंद्रकांत शेटे, राजू गुळवे, संतोष गुळवे,बापू वैद्य, पिंटू वैद्य,पप्पू आंधळकर, महेश डिकोळे, पप्पू जठार, विलास क्षीरसागर, गणेश उंबदंड, सचिन गुळवे, शिवकुमार गुळवे, आदित्य आर्वे, सोमनाथ कथले,दादा राजमाने, गणेश नरूळे, सचिन कथले, डॉ चंदन सरताळे संदिप कुंभार विश्वनाथ बनगार, डॉ. निखिल आर्वे, कनाळकर यांनी परिश्रम घेतले.

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ.अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

# विठ्ठलवाडीचे सुपूत्र सचिन कदम यांना पोलिस महासंचालक यांचे सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान



**माढा (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलवाडीचे सुपुत्र व सध्या नागपूर येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागात उपायुक्तपदी कार्यरत असलेले सचिन तुकाराम कदम यांना नुकताच पोलिस दलामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल महसून मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिद्री ,नागपूरचे आयुक्त रविंद्र सिंघल पोलिस महानिरीक्षक दिलीप पाटील ,व मान्यवर उपस्थित होते. सचिन कदम हे २०१७ मध्ये पोलिस खात्यात पोलिस उपअधिक्षक या पदावर रुजू झाले. जळगाव ,बुलढाणा अकोला या ठिकाणी कार्यरत असताना उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना नुकताच पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह व पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलिस उपायुक्त सचिन कदम यांचे कौतुक करुन अशा कर्तृत्वदक्ष अधिका-यांची सध्या गरज आहे. असेही यावेळी सांगितले.त्यांची लहान बहिण सोनाली कदम या सातारा येथे पोलिस उपअधिक्षक या पदावर सेवा बजावत आहेत तर बंधू प्राध्यापक म्हणून कोरेगाव ,सातारा येथे कार्यरत आहेत. विठ्ठलवाडी हे गाव अधिका-यांचे गाव म्हणून ओळखले जाते .शासनाच्या विविध खात्यामध्ये येथील तरुण आपली सेवा उत्कृष्टपणे बजावत आहेत. सचिन कदम यांना मिळालेला पुरस्कार नक्कीच नविन दिशा देणारा ठरणार आहे .याबद्दल विठ्ठलवाडीचे सरपंच मोनिका खरात उपसरपंच हनुमंत जाधव यात्रा कमिटीचे धनाजी सस्ते किशोर गुंड सुरेश शेगर मित्र मंडळा कडून पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

# राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेचे घवघवीत यश



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** शहरातील कै.नामदेवराव जगताप न.प.उर्दु शाळेत आज महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने GTS राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत करमाळा येथील कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेतील विध्यार्थिनी आलीना इलियास शेख हीने सोलापूर जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला व राज्यात तेरावा क्रमांक मिळविल्या तसेच बरीरा सादिक शेख या विध्यार्थिनीचा जिल्ह्यात तीसरा क्रमांक आल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती तर्फे अध्यक्ष मजहर भाई शेख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना मौलाना मोहसीन म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून शाळेची प्रगतीत वाढ होत असून शाळेतील विद्यार्थ्यी अनेक परिक्षेत उत्तुंग यश मिळवत आहेत. शाळेच्या निकालाचा आलेख दरवर्षी वाढलेला दिसून येत आहे आणि यामागे खरी ताकद ही या शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांची आहे असे ते यावेळी म्हणाले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर, मौलाना मोहसीन, मौलाना सिकंदर, हाफीज अन्वर, शकुर भाई शेख, अजहर शेख, आनिस कुरेशी, हाजी ख्वाजा हुसेन कुरेशी, हाफीज कादर सहाब, मुजावर सर,राजु नालबंद,मजहर पठाण, इम्रान शेख, इस्माईल सय्यद,अजहर शेख, इकबाल शेख,अदि मान्यवर उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, शिवदास कोकाटे, मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना निगार मुंडेवाडी यांचे मार्गदर्शन लाभले.